# प्रेसनोट

दि.१९/०५/२०२२

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर गु.र.नं.३०४०/२०१४ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, १२, १३(१)(ड) सह १३(२) |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)शितल राजधर सावळे,निवासी नायब तहसिलदार,वर्ग–२,तहसिल कार्यालय,संगमनेर, जि.अहमदनगर<br>२)सुभाष विठठल भारती, कनिष्ठ लिपीक, वर्ग–३,तहसिल कार्यालय संगमनेर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १६,०००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १६,०००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार श्री.उत्तम पर्बतराव वर्पे, धंदा–शेती व वाळु व्यवसाय, रा.कनोली, ता.संगमनेर,जि.अहमदनगर यांचे ताब्यातील वाळुचा पंचनामा केला होता परंतु त्यांचेविरुध्द पुढील कायदेशीर कारवाई न करणेसाठी आरोपी लोकसेवक नं.१ शितल राजधर सावळे, नायब तहसिलदार यांनी दि.८/७/२०१४ रोजी पंचासमक्ष तक्रारदार श्री.वर्पे यांच्याकडे १६०००/– रुपये लाचेची मागणी करुन आरोपी लोकसेवक नं.२ सुभाष विठठल भारती, कनिष्ठ लिपीक यांचे हस्ते स्वीकारली असता दोघांना पकडले होते. सदर बाबत त्यांच्याविरुध्द संगमनेर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे दि.८/७/२०१४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.<br>सदर सापळा कारवाई अशोक देवरे, तत्कालीन पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अहमदनगर यांनी केली होती व त्यांनी गुन्हयाचा तपास पूर्ण करुन मा.विशेष न्यायालय, संगमनेर येथे नमुद दोन्ही आरोपींविरुध्द दि.१९/११/२०१५ रोजी दोषारोपपत्र दाखल केले होते.<br>सदर खटल्याची सुनावणी मा.श्री.डी.एस. घुमरे, अतिरिक्त सत्र न्यायालय–१,संगमनेर, जि.अहमदनगर यांचे समोर होऊन पोलीसांनी केलेला चांगला तपास व महत्वाच्या साक्षीच्या आधारे मा.न्यायालयाने आरोपी लोकसेवक नं.२ सुभाष विठठल भारती यांना आज दि.१९/०५/२०२२ रोजी १)भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ अन्वये ३ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ३०००/– रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद तसेच २)भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम १३(२)अन्वये ४ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा व ४०००/– रुपये दंड, दंड न भरल्यास ४ महिने साधी कैद अशी शिक्षा सुनावली असून आरोपी लोकसेवक नं.१ शितल राजधर सावळे यास संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त केले आहे.<br>सदर खटल्याचे सरकार पक्षातर्फे ॲड.बी.जी.कोल्हे, सहायक सरकारी अभियोक्ता, संगमनेर, जि.अहमदनगर यांनी काम पाहिले असून त्यांना पोकॉ.वैभव पांढरे यांनी मदत केली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक :– ९९३०९९७७००

(हरीष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर